# सामाजिक समस्यांची संकल्पना

A) Coneept Of Social Problem

* प्रस्तावणा :-

सामाजिक समस्यांचा अभ्यास करणे हा समाजशास्त्राचा महत्त्वाचा अभ्यासविषय मानला जातो. कारण सामाजिक समस्या या समाजातील व्यक्तिंवर मोठ्या प्रमाणात दृश्य परिणाम करतात. त्याचा परिणाम समाजावर देखील होतो. सामाजिक समस्या या मानव निर्मित आहेत. त्यामुळे त्याचे चांगले /वाईट परिणाम मानव समाजाला भोगावे लागतात. सामाजिक समस्यांचे स्वरूप अखिल मानव समाजात सार्वत्रिक स्वरूपाचे आहे. सध्य स्थितीमध्ये सामाजिक समस्यांनी संपुर्ण समाज व्यवस्थेला व्यापलेला आहे. भारताचा विचार केला तर भारतात ही सामाजिक समस्यांचे परिणाम अधिक आहे.

* सामाजिक समस्या : अर्थ व स्वरूप

समस्या या संकल्पनेसाठी Problem हा इंग्रजी शब्द वापरला जातो. या शब्दाचा अर्थ असा प्रश्न की त्याची सोडवणुक किंवा निराकरण केले पाहिजे. सामाजिक समस्या या समाज्यातील एखाद्या व्यक्तिशी किंवा ठराविक लोकांशी संबंधीत नसतात. तर त्या समाज्यातील बहुसंख्य लोकांना अशा परिस्थितीला सामोरे जावे लागते. एखाद्या व्यक्तिगत प्रश्न संबंधित व्यक्तिने सोडवणे अपेक्षीत असते तर सामाजिक समस्या बहुसंख्य लोकांशी संबंधीत असतात.

उदा ;-

1 व्यक्तिगत समस्या :-

एखादा विद्यार्थी नापास होणे, एखाद्या रुग्णावरती शस्त्रक्रिया करणे.



Scanned with CamScanner

2) सामाजिक समस्या :-

भ्रष्टाचार, दहशतवादी, दारिद्र्य इ.

सामाजिक समस्येच्या संदर्भात व्यक्तिगत अर्थ अभिप्रेत नसून त्याचे सामाजिक स्वरूप अभिप्रेत आहे. सामाजिक विघटनामधून समस्यांची निर्मिती होते. समाजाच्या प्रत्येक कालखंडात सामाजिक समस्या आढळून येतात. बदलत्या परिस्थितीनुसार या समस्येचे स्वरूप बदलत जाते. भारतात 19 व्या शतकात सतीप्रथा, देवदासी बालविवाह, अस्पृश्यता समस्या होत्या. आज मात्र बेकारी भ्रष्टाचार, गुन्हेगारी या समस्या आहेत. सामाजिक समस्यांची संकल्पना अभ्यासण्यासाठी या संकल्पनेच्या काही व्याख्या विचारात घ्याव्या लागतात.

* व्याख्या :-

1) वेइन वर्ग :-

"सामाजिक समस्या म्हणजे अशी परिस्थिती की जी समाजातील बहुसंख्य लोकांच्या सामाजिक मूल्यांशी विसंगत असून त्या परिस्थितीत बदल करण्यासाठी प्रत्यक्ष कृती करण्याची गरज आहे. असे त्या लोकांचे मत आहे."

2) फुल्लर व मायर्स :-

"सामाजिक समस्या म्हणजे असे वर्तन प्रकार किंवा परिस्थिती की जी त्या समाजातील अनेकसदस्यांना अनिष्ट वाटते या सामाजिक समस्या सोडवण्यासाठी व त्याची व्याप्ती कमी करण्यासाठी काही योजना धोरणे व प्रत्यक्ष कार्याची आवश्यकता आहे. यास त्या सदस्यांनी मान्यता असते."

3) निस्बेट :-

"सामाजिक समस्या म्हणजे एखाद्या समाजातील



Scanned with CamScanner

वर्तनातील बिघाड कि ज्याचे परिणाम गंभीर स्वरुपात समाजातील इतर अनेक सदस्यांना भोगावे लागतात.

4) हर्टन व लेस्ली :-
"सामाजिक समस्या म्हणजे अशी एक सामाजिक परिस्थिती जी त्या समाज्यातील बहुसंख्य लोकांना अशी प्रभावित करते की त्यांना ती अनिष्ट वाटून त्याबाबत सामुहिक कृती द्वारा काही उपाययोजना करणे आवश्यक वाटू लागले"
सामाजिक समस्या ही एक अशी परिस्थिती आहे. कि ज्या परिस्थितीत सदस्यांचे वर्तन हे समाजामधील प्रमाणकांशी विसंगत असते. अशा परिस्थितीकडे समाजातील बहुसंख्य विचारवंताचे लक्ष वेधले जाते. व त्यासाठी सामुहिक प्रयत्न आवश्यक मानले जातात.

## * सामाजिक समस्येची वैशिष्टे :-

सामाजिक समस्यांच्या वरील काही व्याख्यांच्या आधारे असे निदर्शनास येते कि सामाजिक समस्यांच्या व्याख्येबाबत विचार वंतामध्ये एकमत दिसून येत नाही. हि सकल्पना अधिक स्पष्ट होण्यास पुढील काही वैशिष्टे अभ्यासणे महत्वाचे ठरते.

1) समाजातील बहुसंख्य सदस्यांचे मत :-
एखाद्या समाजात निर्माण झालेल्या विशिष्ट परिस्थितीमुळे या समाजातील नियमांचा, आदर्श व समाजमान्य वर्तन पद्धतीचा भंग होत असून ही परिस्थिती समाजासाठी विघातक आहे. अशी धारणा त्या समाजातील जास्तीत जास्त लोकांची झाली तरच त्या परिस्थितीला सामाजिक समस्या म्हणुन ओळखले जाते. परिस्थिती समाज विरोधी आहे. प्रगती मध्ये अडथळा करणारे आहे. असे बहुसंख्य लोकांना वाटत नाही.



Scanned with CamScanner

तोपर्यंत त्यास समस्या मानली जात नाही.

② प्रचलित समाजमुल्यांशी विसंगती :-

व्यक्तिचे कोणते वर्तन योग्य आणि कोणते अयोग्य हे ठरविण्याचे कार्य त्या समाज्यातील संस्कृतीने स्विकारलेल्या सामाजिक मुल्यांच्या आधारे केले जाते. उदा; उदनिर्वाह करण्यासाठी स्वकष्टाची कमाई हे योग्य वर्तन मानले जाते. सामाजिक मुल्यांप्रमाणे होणारे वर्तन हे समाजमान्य असते व त्याचे उल्लंघन करणारे वर्तन हे विसंगत वर्तन म्हणजेच समस्या म्हणुन ओळखले जाते.

सामाजिक मुल्य स्थिर आहेत तो पर्यंत सामाजिक मुल्यांशी वर्तन समस्या म्हणुन ओळखले जाते. काही वेळा समाज्या मध्ये नविन सामाजिक मुल्यांचा स्वीकार केला जातो त्यावेळी अयोग्य मानले जाणारे वर्तन कदाचित योग्य ठरवले जाते. समाज्याच्या वर्तमान स्थितीत अशी एखादी परिस्थिती निर्माण झाली ती सामाजिक मुल्यांशी विसंगती असेल तर त्या परिस्थितीला सामाजिक समस्या म्हणुन ओळखले जाते.

③ सार्वत्रिकता :-

सामाजिक समस्यांचे अस्तीत्वाचे ही एक सार्वत्रीक बाब आहे. उच्च शहणीमान, प्रगतशील असा शहरी समाज असो साधे जीवन जगणारा आदीवासी समाज असो अशा प्रत्येक समाजामध्ये सामाजिक समस्या या कमी जास्त प्रमाणात निर्माण झालेल्या असतात. त्या प्रमाणे ऐतिहासीक देखील असु शकतात. समस्येचे स्वरुप, प्रमाण यामध्ये समाजानुसार बदल जाणवतो. म्हणजेच सामाजिक समस्यांचे स्वरुप सार्वत्रीक आहे.

④ समाजसापेक्षता :-

सामाजिक समस्या या सार्वत्रीक स्वरुपाच्या असतात. त्याचप्रमाणे त्या समाजापेक्षा असतात.



Scanned with CamScanner

याचा अर्थ एखादा विशिष्ठ वर्तन प्रकार किंवा परिस्थिती सर्वच समाजामध्ये दिसुन येते. मात्र अशा वर्तनाकडे एकाच दृष्टीकोणातुन पाहिले जात नाही. कारण प्रत्येक समाजाची संस्कृती व सामाजिक मुल्ये ही दुसऱ्या समाज्यापेक्षा वेगळी असतात. व्यक्तिचे विशिष्ठ वर्तन एखाद्या समाजात चांगले मानले जाते. तर काही ठिकाणी चांगले मानले जाईलच असे नाही.

उदा ; बहुविविध मद्यपान यास मान्यता आहे. तर काही समाजात यास मान्यता नाही. यावरुन असे स्पष्ठ होते. कि सामाजिक समस्या समाज सापेक्ष असतात.

⑤ सामुहिक उपाययोजनांची गरज :-

समाजरचने मध्ये निर्माण झालेली विशिष्ठ परिस्थिती समाजमुल्यांशी विसंगत अनिष्ठ आहे. असे बहुसंख्य लोकांना वाटणे इतका मर्यादित अ सामाजिक समस्यांचा होत नाही तर अशी निर्माण झालेली परिस्थिती समाजमुल्यांशी विसंगत असुन त्यावर उपाय शोधण्याची गरज आहे. अन्यथा गंभीर परिणाम भोगावे लागतात. या साठी सामुहीक उपाययोजना करणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

अशा उपाययोजना हे ठराविक लोकांचे काम नसुन त्याठीकाणी सामुहिक प्रयत्न आवश्यक असतात. प्रसिद्ध विचारवंत हर्टन मते समस्या मानवनिर्मित असल्याने त्यावरती उपायदेखील समाजाच शोधले पाहिजेत सामुहिक उपाय केल्यास समाज स्थितशील न राहता गतिशील बनतो. यासाठीच समस्यांचे निराकरण करण्यासाठी सामुहीक उपाय-योजनांच्या प्रयत्नांची गरज असते.

⑥ संवेदनाभिन्नता :-

समाजातील सर्वच सदस्यांना त्या समाज्यातील समस्या विषयी असणाऱ्या संवेदना येत असतीलच असे नाही सर्वच सादस्यांना सामाजिक समस्या समाजनिर्मिती



Scanned with CamScanner

असून त्या समाजनिर्मित वाटल्यालीतच असे नाही. सर्वांस कारण समाजातील सदस्यांनी सामाजिक मुल्यांचा स्वीकार कमी जास्त प्रमाणात केलेला असतो.

उदा ; स्वतःची घरे असणाऱ्या लोकांना झोपडपट्टी हि समस्या वाटेलच असे नाही. समाजाच्या स्थनेत त्या समस्ये विषयी एकमत दिसुन येते. मात्र शहरासारख्या विजाती समुहात समस्येविषयी असणाऱ्या संवेदनामध्ये भिन्नता दिसुन येते.

⑦ संमिश्र स्वरुप :-

समाजातील कोणत्याही समस्येच्या निर्मितीसाठी अनेक कारणे जबाबदार असतात. अनेक कारणांचा घटनांचा परिणाम त्याच्या एकत्रिकरणातुन सामाजिक समस्या उदयास येतात. परिणामी सामाजिक समस्यांचे होणारे परिणाम हे देखील व्यापक स्वरुपाचे असतात.

भारतातील दारिद्र्य, बेकारी, गुन्हेगारी, झोपडपट्टी या समस्या परस्पर संबोधित असून निर्मितीसाठी देखील परस्पर जबाबदार आहेत याचाच अर्थ सामाजिक समस्यांचे स्वरुप संमिश्र असते.

⑧ सामाजिक समस्या सामाजिक कल्यानामध्ये अयथळा ठरत असतात.

⑨ सामाजिक समस्या प्रकट व अप्रकट स्वरुपाच्या असतात.

सामाजिक समस्यांची निर्मिती समाजमुल्यांशी विसंगत वर्तनामधुन झालेली असते समस्या लहान असो किंवा व्यापक त्याचा अनिष्ट परिणाम समाजरचनेवरतीच होत असतो. हा परिणाम टाळण्यासाठी समाजव्यवस्था संघटीत ठेवण्यासाठी सामुहिक उपाय योजनांची गरज बहुसंख्य सदस्यांना वाटत असते. त्यासाठी आवश्यक प्रयत्न केले जातात. सामाजिक मुल्ये. सामाजिक



Scanned with CamScanner

नियमने यांच्या विरोधात केले जाणारे वर्तन किंवा निर्माण झालेल्या परिस्थितीला सामाजिक समस्या म्हणून ओळखले जाते. वरील प्रमाणे सामाजिक समस्या ही संकल्पना स्पष्ट केली आहे.

## (B) सामाजिक समस्यांचे वर्गीकरण

* प्रस्तावणा :-

सामाजिक संबंधाच्या जाळ्यामधुनच समाज्याची निर्मिती होत असते. सामाजिक संबंधाच्या माध्यमातुनच व्यक्तिंच्या गरजांची पुर्तता केली जाते. समाज्यामध्ये सामाजिक संबंधातुन समाजाच्या निर्मिती बरोबरच सामाजिक समस्या, प्रश्न, वाद, याची देखील निर्मीती झाली आहे. सामाजिक समस्या या ऐतिहासिक व सार्वजनिक स्वरुपाच्या असतात. आज जगातील सर्व देश कोणत्याना कोणत्यातरी समस्येला सामोरे जात आहे परंतु भारतातील सामाजिक समस्या या आपल्या समस्या विभिन्न स्वरुपाच्या आहेत. त्यामुळे सामाजिक समस्यांचे वेगवेगळ्या प्रकारामध्ये वर्गिकरण केले जाते. प्रसिद्ध विचारवंत केस फुल्लर व मायर्स या विचारवंतांनी सामाजिक समस्यांचे वर्गिकरण पुढील प्रमुख प्रकारांमध्ये केले आहे.

(1) भौतिक /पर्यावरणीय समस्या :-

आपल्या सभोवतालच्या भौगोलीक परिस्थिती मध्ये ज्या वेळी कमी अधिक प्रमाणात बदल होतात. त्यावेळी पर्यावरणीय समस्या निर्माण होतात. उदा ; भूकंप, दुष्काळ, महापुर इ. या बरोबर पर्यावरण प्रदुषित परिस्थिती ज्यावेळी निर्माण होते. त्यावेळी देखील सामाजिक समस्यांची निर्मिती होते.

उदा ; जागतिक तापमान वाढ - ओझोन कमी होते

इ.



Scanned with CamScanner

② पारंपारिक स्वरुपाच्या समस्या किंवा परंपरागत समस्या :-
भारतीय समाज्यात त्या बरोबरच कोणत्याही मानवी समाजात काही पारंपारिक समस्या आजही दिसुन येतात
अंदश्रद्धा, स्त्रीभ्रुण हत्या भिक्षा वृत्ती भोंदुगीरी इ. आजही अशा पारंपारिक समस्या मोठ्या प्रमाणात दिसुन येतात.

③ आर्थिक स्वरुपाच्या समस्या :-
आजही भारतात आर्थिक स्वरुपाच्या अनेक समस्या दिसुन येत आहेत प्रतिकुल, गरीब, अशा आर्थिक परिस्थितीमुळे या समस्या निर्माण झालेल्या आहेत.
उदा ; दारिद्र्य, बेकारी, झोपडपट्टी, गुन्हेगारी इ.

④ औद्योगिकरण व नागरीकरण यामुळे निर्माण झालेल्या समस्या :-
औद्योगिकरणामुळे उद्योग धंद्यांची निर्मिती झाली त्यामुळे नागरीकरणाला चालना मिळाली. या प्रक्रियांमुळे आधुनिक तंत्रज्ञान यंत्र सामुग्री यामध्ये वाढ घडुन आली परंतु या बरोबरच औद्योगिकरण व नागरीकरणामुळे काही समस्यांची निर्मिती झाली बेकारी, जलप्रदुषण हवाप्रदुषण, वाहतुकीची समस्या, कामगारांचे प्रश्न, वृद्ध लोकांचे प्रश्न इ.

⑤ राजकिय स्वरुपाच्या समस्या :-
राजकिय सत्ता प्राप्त करणे ती सत्ता टिकवुन ठेवणे अशा महत्वाकांक्षे पोटी योग्य तत्वांची, विचारांची जाणिव पुर्वक पायमल्ली केली जात आहे. यामधुनच अनेक गंभिर स्वरुपाच्या समस्या आज निर्माण झालेल्या आहेत राजकिय पक्ष, निवडणुका, सत्ता या राजकिय महत्वकांक्षे मधुन विविध प्रकारच्या राजकिय समस्या निर्माण झालेल्या

आहे.
उदा; भ्रष्टाचार, सांप्रदायिक वाद, धार्मिक तणाव, दहशतवाद, पक्षांतर इ.

⑥ धार्मिक स्वरूपाच्या समस्या :-
धर्म संस्था ही समाजातील महत्वपूर्ण, मूलभूत, सामाजिक संस्था म्हणून ओळखली जाते. धर्म सामाजिक नियंत्रणाचे प्रभावी माध्यम आहे. परंतू आज धार्मिक क्षेत्र धार्मिक अंधश्रद्धा, धार्मिक विविधता, यामधून अनेक सामाजिक समस्यांची निर्मिती झालेली आहे. त्या समस्या धार्मिक स्वरूपाच्या आहेत.
उदा; दहशतवाद, मूलतत्ववाद, सांप्रदायवाद, धार्मिक दंगली इत्यादी.

⑦ नैतिक समस्या :-
नैतिक समस्या या समाजातील सामाजिक मूल्यांशी संबंधीत असतात. सामाजिक मूल्ये, नैतिक मूल्ये याविरोधी वर्तन केल्यामुळे काही समस्या निर्माण होत असत. अशा नैतिक समस्या आज वाढत चाललेल्या आहेत.
जुगार, मादक, पदार्थांचे सेवन अशा वृत्ती बलात्कार इ.

⑧ सामाजिक स्वरूपाच्या समस्या :-
व्यक्ती आणि समूह यांच्या परस्पर संबंधामधून समाजाची निर्मिती होत असते. व्यक्ति-व्यक्ती, व्यक्ति-समूह, यांच्यातील सामाजिक संबंध ज्यावेळी बिघडतात. अशा वेळी समाजामध्ये सामाजिक विघटन घडून येतात. सामाजिक विघटनामुळे सामाजिक ~~विघटन~~ नियंत्रणाची व्यवस्था प्रभावीपणे काम करू शकत नाही. त्यामुळे सामाजिक विघटनामुळेच समाजात अनेक समस्यांची निर्मिती झालेली आहे.
उदा; भ्रष्टाचार, गुन्हेगारी, हुंडाबळी, स्त्रीयांवरील अत्याचार इ.



Scanned with CamScanner

सारांश :-
वरिल प्रमाणे मानवी समाजात निदर्शनास येणाऱ्या समस्यांचे वर्गीकरण वेगवेगळ्या प्रकारांमध्ये केले जाते या समस्या विभिन्न घटकाशी संबंधीत असल्यावरी सर्व समस्या मानव निर्मित आहेत या समस्या समाजव्यवस्था राष्ट्रीय प्रगती मानवी हक्क यामध्ये अडथळा, बाधा, पोहचवत आहेत. त्या मुळे सर्व सामाजिक समस्यांचे निराकरण करणे. अत्यंत आवश्यक आहे.

## (C) सामाजिक प्रश्नांच्या किंवा समस्यांच्या अभ्यासाची गरज किंवा आवश्यकता / महत्व

* प्रस्तावणा :-
भारतीय समाज्यात प्राचिन कालखंडामध्ये देखील व मध्ययुगात देखील सामाजिक समस्यांचे अस्तित्व होते. परंतु त्याच्याकडे समस्या म्हणुन पाहिले जात नव्हते.
अस्पृश्यता, सतीप्रथा, गुलामगिरी इ. परंतु ब्रिटीश राजवटीत भारतात बुद्धी प्रामाण्यवादास महत्व आल्याने अशा समस्यांची जाणीव होवु लागली त्या मधुनच त्या समस्यांच्या निराकरणाकडे विशेष लक्ष देण्यात आले. परिणामी त्या समस्या नष्ट करण्यात यश मिळाले.
या वरिल विश्लेषणावरुन असे दिसुन येते की सामाजिक समस्या हा एक समाजाच्या अभ्यासाचा महत्वाचा घटक किंवा विषय आहे. मानवी समाज्याला स्थिरता प्राप्त करुन देणारी असेल तर अशा समस्यांचा अभ्यास केला पाहिजे समाजशास्त्रीय ज्ञानाचा उपयोग हा सामाजिक समस्या सोडवण्यासाठी केला जातो. आज भारतीय भारतीय समाज्यात अनेक प्रकारच्या समस्यांची तीव्रता वाढत चालली आहे.
दारिद्र्य, बेकारी, झोपडपट्टी, गुन्हेगारी

बालगुन्हेगारी, भ्रष्टाचार यासर्व समस्यांचे निर्मुलन करावयाचे असेल तर त्याचाअभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे.

सामाजिक समस्यांच्या अध्ययनाची अवश्यकता आज अधिक प्रमाणात भासत आहे. त्यामुळे सामाजिक प्रश्नाची समस्यांचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे.

① सामाजिक परिवर्तन :-

मानवी समाज हा परिवर्तनशील व गतिशिल आहे. समाजात सतत परिवर्तन होत असल्यामुळे विकासाला चालना मिळत आहे. त्याच बरोबर सामाजिक परिवर्तन अनेक समस्यांची निर्मिती करत आहे. समाजाचा विकास साध्य करावयाचा असल्यास या समस्यांचे निराकरण करणे आवश्यक आहे. त्यामुळे सामाजिक समस्येच्या अध्ययनाची आज गरज निर्माण झालेली आहे.

② बदलती सामाजिक मुल्ये :

सामाजिक मुल्यांमुळे समाज व्यवस्था टिकुण राहत असते. समाजाला संघटन प्राप्त होत असते. परंतु सामाजिक मुल्येच जर बदलली तर समाजा मध्ये विघटन घडून येते. जुन्या व नव्या सामाजिक मुल्यांमध्ये संघर्ष निर्माण होतो. त्या संघर्षना मधुनच कौटुंबीक विघटन, घटस्फोट, वृद्धांच्या समस्या या सारख्या समस्या निर्माण होतात. त्यामुळे अशा समस्याचे निराकरण करण्यासाठी सामाजिक समस्यांचा अभ्यास करावा लागतो.

③ आर्थिक विकास :-

आर्थिक विषमता, वाढती लोकसंख्या यामुळे बेकारी, दारिद्र्य गुन्हेगारी या सारख्या समस्यांची निर्मीती झाली आहे.

समस्या देशाच्या विकासात अडथळा ठरत आहेत. जर आपणाला भारताचा आर्थिक विकास साध्य करावयाचा असेल तर सर्वप्रथम या समस्या, अडथळे यांच्या अध्ययनाची आवश्यकता आहे.

④ सामाजिक व राजकिय सुरक्षा :-

व्यक्ती - व्यक्ती मधील परस्पर संबंधातून समाजाची निर्मिती होते. प्रत्येक समाजाला विशिष्ठ संरचना प्राप्त झालेली असते. परंतु आज अनेक सामाजिक, राजकिय धटकांमुळे संरचनेचे आस्तित्व धोक्यात आले आहे. अनेक समस्यांची निर्मिती झाली आहे. शांतता, सुव्यवस्था निर्माण करावयाची असेल सामाजिक व राजकिय सुरक्षितता प्रस्थापित करायची असेल तर सर्व प्रथम त्या ठिकाणी असणाऱ्या समस्या नष्ट करणे आवश्यक आहे. परिणामी या कारणांसाठी देखील अभ्यासाची आवश्यकता आहे.

⑤ शासकिय योजनांचा प्रसार :-

समाज्यातील सर्व समस्यांकडे लक्ष केंद्रीत होईलच असे नाही. अनेक वेळा अनेक समस्या दुर्लक्षीत रहतात. अशा दुर्लक्षीत समस्यांचा अभ्यास करुन त्यांचे निर्मुलन करण्यासाठी आवश्यक शासकिय योजनांची निर्मिती करणे. आवश्यक असते. परिणामी शासकिय योजनांचा प्रसार करण्यासाठी नवीन योजना निर्माण करण्यासाठी त्याचे मुळ म्हणजेच सामाजिक समस्या याचा अभ्यास सर्वप्रथम करणे आवश्यक आहे.

⑥ मानवी समाजाची पुर्ननिर्मिती करण्यासाठी सामाजिक समस्येचा अभ्यासाची आवश्यकता आहे.



Scanned with CamScanner

⑦ सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी समस्यांच्या अध्ययनाची आवश्यकता आहे.

⑧ समाजाच्या गरजांची पुर्तता करण्यासाठी समस्येचा अभ्यास करणे महत्वाचे आहे.

⑨ समाज्यातील गरजू, वंचित, अपंग अशा लोकांना साह्य करण्यासाठी, संरक्षण देण्यासाठी त्यांच्याशी संबंधीत समस्यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

⑩ भारतीय राज्यघटनेच्या कल्यानकारी राज्याच्या कल्पनेचे ध्येय पूर्ण करण्यासाठी देशातील समस्यांचा अभ्यास करुन त्या नष्ट करण्यासाठी समस्येच्या अभ्यासाला महत्व प्राप्त झालेले आहे.

* सारांश :-

सामाजिक समस्येंचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातुन अभ्यास करुन त्यांची सोडवणुक करणे उपाय योजना सुचवणे समस्यां विषयीचीं जाणिव जागृती निर्माण करणे यासाठी सामाजिक समस्यांचा प्रश्नांच्या अभ्यासाला विशेष महत्व प्राप्त झालेले आहे.

—— *** ——



Scanned with CamScanner

* प्रश्न

* दिर्घोत्तरी प्रश्न -

① सामाजिक समस्या, किंवा प्रश्न / मुद्दे याचे स्वरुप स्पष्ट करा. ?

② सामाजिक समस्येची संकल्पना स्पष्ट करा ?

③ सामाजिक समस्यांचे वर्गिकरण स्पष्ट करा ?

④ सामाजिक समस्येच्या अभ्यासाठीची आवश्यकता स्पष्ट करा. ?

② टिपा लिहा

① सामाजिक समस्येचे स्वरुप

② सामाजिक समस्येचे वर्गिकरण

③ सामाजिक समस्यांच्या अभ्यासाठीची आवश्यकता



Scanned with CamScanner

Topic No-2

# Social Issues in India
भारतातील सामाजिक मुद्दे किंवा प्रश्न.

## सामाजिक धार्मिक मुद्दे / प्रश्न
## Social Cultural Issues.

### (A) सांप्रदायवाद / संप्रदायिकवाद : अर्थ, कारणे, व उपाययोजना
### Communalism : Meaning Caues & Remedies.

* प्रस्तावना :-

भारत हा बहुधार्मिक बहुभाषिक अनेक जाती भिन्न-भिन्न वंश, विभीन्न संस्कृती इ. अस्तित्व असणारा विविधतेने नटलेला देश म्हणुन ओळखला जातो. भारतातील या विविधते मध्ये एकता देखील निर्माण झालेल्या दिसुन येते.

विशेष : भारतात मोठ्या प्रमाणात धार्मिक विविधता असुन त्यामध्ये एकता निर्माण झालेली आहे. परंतु सध्या परिस्थितीत भारतात धार्मिक मतभेद संघर्ष वाढत चालला असल्याचे दिसुन येत आहे. याला जबाबदार असणारे सर्वात प्रभावी कारण म्हणजे संप्रदायवाद किंवा सांप्रदायिकवाद होय. ज्यावेळी एखादा धार्मिक समुदाय दुसऱ्या एखाद्या धार्मिक समुदायास विरोध करतो. अपमानीत करतो. अन्याय करतो. अशा वेळी सांप्रदायिकवादाची निर्मिती होते. भारतीय राज्यघटनेने सहिष्णुता समानता न्याय निर्माण करण्याचा प्रयत्न केला असला तरी आज भारतात धार्मिक कट्टरता धार्मिक असहिष्णुता धार्मिक संघर्ष मोठ्याप्रमाणात निर्माण झालेल्याचे निदर्शनास येत आहे. सांप्रदायिकता किंवा सांप्रदायिक वाद हा राष्ट्रीय एकात्मतेमधील मोठा अडथळा आहे. सांप्रदायिकवादामुळे भारताची धर्म निरपेक्ष समाजवादी राज्याची संकल्पना मागे पडत चालली आहे. सांप्रदायिक वादामुळे भारताची धर्म-निरपेक्ष समाजवादी राज्याची संकल्पना मागे पडत चालली आहे.

उदा ; इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर हिंदु आणि शिख समुदायात झालेला संघर्ष 1993 मध्ये अयोध्या येथील

बाबरी मज्जिद पडल्यानंतर निर्माण झालेला संघर्ष काश्मीर मधील दोन धार्मिक समुदायातील संघर्ष इ. यासारख्या अनेक घटनांवरुन भारतातील सांप्रदायिक वाद निदर्शनास येत आहे.

* सांप्रदायवाद / सांप्रदायिकवाद अर्थ :-

सांप्रदायिकता ही समाज्यातील एका समुदायाची अशी भावना आहे की तो समुदाय त्या समाजाकडुन योग्य मोबदला मिळत नाही बहुसंख्य लोकांकडुन किंवा त्यांच्या समुदायाकडुन आपल्या समुदायावर अन्याय केले जातात. या जाणिवेतुन असा समुदाय सतत भयग्रस्त राहत असतो. समाजामध्ये विविध धर्म, जात, भाषा, वंश या समुहांचे लोक राहतात. मात्र हे लोक त्या संप्रदायाशी संबंधीत राहुन आपले वर्चस्व सिद्ध करण्याचा आणि इतरांचे अस्वीकरण करण्याचा प्रयत्न करतात. अशा वेळी संप्रदायवादाचा जन्म होतो. संप्रयदाय वाद ही गुंता-गुंतीची सामाजिक घटना असुन या घटनेला सामाजिक व सांस्कृतीक बाजू आहे.

* व्याख्या : definition

① राम अहुजा :-

"एका समुदायात व्यक्तिंना इतर सुमुदाय किंवा धर्मातील व्यक्तिंना केलेला सक्रिय विरोध म्हणजे संप्रदायवाद होय."

② बिपिन चंद्र :-

"एखाद्या समुहातील सदस्य विशिष्ठ धर्माचे अनुयायी असल्यामुळे त्यांचे सामाजिक, राजकिय व आर्थिक हित संबंध समान आहेत अशी श्रद्धा म्हणजे सांप्रदायवाद होय."



Scanned with CamScanner

सांप्रदायवाद किंवा सांप्रदायिकवाद या संकल्पनेचा अर्थ पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल -

① दोन धर्मातील / समुहातील विद्वेश तणाव, शत्रुत्व, संघर्ष याची भावना म्हणजे सांप्रदायवाद होय.

② विभिन्न धार्मिक समुदयातील वैमानस्य भाव व्यक्त करणे म्हणजे संप्रदायवाद होय.

③ धर्मांतर्गत दोन समुदायात असणारा शत्रुभाव, तीरस्कार म्हणजे सांप्रदायवाद होय.

④ एक धार्मिक समुह विशिष्ट विचारधारने प्रेरित होऊन दुसऱ्या धार्मिक समुहास जाणिवपुर्वक विरोध करतो. तो देखील सांप्रदायवाद म्हणुन ओळखला जातो.

⑤ सांप्रदायवादामध्ये दोन परस्परविरोधी समुदायातील संघर्ष तणाव हा धर्म, जात, भाषा, वंश या सारख्या निकषांवर आधारलेला असतो.

⑥ भारतातील सांप्रदायवादाचा प्रमुख आधार धर्म हाच आहे.

⑦ भारतातील सांप्रदायवाद हा राजकारणाचा महत्वाचा पैलु आहे.

⑧ सांप्रदायवाद हा लोकांची समुहावरील निष्ठा आणि विचार सरणी याच्याशी संबंधीत असतो.

⑨ भारत हा हिंदु, मुस्लीम, शिख, हिंदू, ख्रिस्चन, सवर्ण, दलित या संप्रदायामध्ये सांप्रदायिक वाद निर्माण होवून संघर्ष घडुन आलेला आहे.



Scanned with CamScanner

(10) भारतात हिंदू मुस्लिम या प्रमुख दोन संप्रदायामध्ये तणावपूर्ण संघर्षमय परिस्थिती असल्याचे दिसून येते.

वरिल प्रमाणे सांप्रदायवाद किंवा सांप्रदायिकवाद या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट केला जातो.

* सांप्रदायिकवादाची कारणे :-

* प्रस्तावना :

भारतात निर्माण झालेल्या सांप्रदायिकवाद त्यामुळे घडुन येणारा सांप्रदायिक हिंसाचार घडुन येण्यासाठी काही विशिष्ट घटक किंवा कारण यासाठी जबाबदार आहेत राजकिय अभ्यासकांच्या मते राजकिय स्वार्थ, सत्ता प्राप्ती यासाठी सांप्रदायवादाला खतपाणी घातले जाते. मार्क्सवादी अभ्यासकांच्या मते आर्थिक घटकांपासुन वंचित राहिल्यामुळे सांप्रदायिकवादाची निर्मिती होते तर काही अभ्यासकांच्या मते मुलतत्त्ववादी विचार सरणी सांप्रदायिक वादासाठी जबाबदार आहेत. या घटकांबरोबरच सांप्रदायवाद व त्यामधुन घडुन येणारा सांप्रदायिकवाद हिंसाचार यासाठी जबाबदार असणारी कारणे किंवा घटक पुढील प्रमाणे :-

* ऐतिहासिक घटक / कारणे :-

(1) भारतातील प्रमुख सांप्रदायिकवाद म्हणजे हिंदू, मुस्लीम संघर्ष होय. या सांप्रदायवादाचे मुख्य कारण ~~मध्ययुगिन~~ मध्ययुगिन काळातील इतिहासात दिसून येते इस्लामी राज्यकर्त्यांनी सक्तिने केलेले धर्मांतर हिंदू देव-देवता मुर्तीत मंदिरे तोडफोड, स्त्रीयांवरिल अत्याचार यामुळे या दोन सांप्रदायामध्ये असणारे संबंध, संघर्षाचे व तणावपूर्ण आहेत. भारतातील विशिष्ट समुदाय



Scanned with CamScanner

शेजारी देशांवर असणारी निष्ठा, धार्मिक स्थळांच्या जागेवरुन निर्माण झालेला वाद यासारख्या अनेक घटना इतिहासात घडुन गेलेल्या आहेत. या ऐतिहासीक घटनांचा परिणाम या दोन सांप्रदायामध्ये संशयाचे, अविश्वासाचे संबंध निर्माण झालेले आहेत. त्यामुळे सांप्रदायिक हिंसाचाराला व सांप्रदायवादाला चालना मिळालेली आहे.

② अल्पसंख्यांक लोकांना वाटणारी असुरक्षितता :-

समाजामध्ये विविध प्रकारच्या अनेक लहान-मोठे समुह एकत्र येतात. अशा वेळी अल्पसंख्यांक लोकांना बहुसंख्यांक लोकांच्या समुहाकडून असुरक्षीतता, भिती वाटत असते. बहुसंख्यांक समुहाचे लोक अल्पसंख्यांक लोकांच्या वरती दबाव टाकून पक्षपाती पणाचे धोरण स्विकारतात. त्यामुळे अल्पसंख्यांक समुहाचे लोक त्यांच्यात असुरक्षीतता निर्माण होते. या असुरक्षीते मधुनच किंवा भावनेतुन हिंसाचाराच्या घटना घडतात. परिणामी अल्प संख्यांकामध्ये असणारी असुरक्षीततेची भावना सांप्रदाय -वादास जबाबदार ठरते.

③ पुर्वग्रह :-

एखादी व्यक्ति किंवा समुह/सांप्रदाय यांच्या बद्दल अनुभवा अधिच विशिष्ट मत तयार करणे. म्हणजे पुर्वगृह होय. भारतात सर्व सांप्रदायांमध्ये परस्परविषयी प्रामुख्याने हिंदू, मुस्लीम सांप्रदायामध्ये अनेक प्रकारचे पुर्वग्रह लहान पणा पासूनच ~~अ~~ व्यक्तिच्या मनावर बिंबवले जातात. त्याचा परिणाम एक समुह परस्पर विरोधी समुहात धार्मिक व सांस्कृतिक दृष्ट्या आपला ~~श~~ शत्रु समाज असतो. समाजामध्ये असा राजकिय दृष्ट्या आपला शत्रु समाजात समजत असतो. समाजामध्ये असा राजकिय स्वार्थासाठी जाणिवपुर्वक निर्माण केला जातो.

त्यामुळे पूर्व ग्रहांमुळे सांप्रदायिकता व सांप्रदायिक हिंवसाचार यास चालना मिळते.

④ धार्मिक कारणे :-
भारतामध्ये धर्मनिरपेक्ष विचारांची विल्हे वाट होवुन मुलतत्ववादी विचार सरणी प्रस्थापित झाल्या काहि विशिष्ट समुदायामध्ये असहिष्णुता, धार्मिक संघटन राजकिय संघटना व परस्पर परंपरावादी सामाजिक मुल्यांना अधिक महत्व निर्माण झालेले आहे अशा वेळी राजकिय उद्दीष्ट साध्य करण्यासाठी धर्माचा साधन म्हणुन वापर केला जातो. धर्म, पवित्र धर्मग्रंथ प्रार्थना अशा धार्मिक कार्यक्रमांमधुनच सांप्रदायाची विचार सरणी निर्माण केली जाते. त्याचा परिणाम दोन परस्पर विरोधी धर्मांमध्ये अशा काही घटना घडतात त्यामुळे सांप्रदायिक हिंसाचार घडून येतो
उदा ; हिंदूच्या मंदीराची आणि मुर्तीची विटंबना केल्याने हिंसाचार घडून आलेला आहे.

⑤ संधीसाधु नेतृत्व :-
भारतात एखाद्या विशिष्ट धार्मिक कारणावरुन सांप्रदायिक वाद व हिंवसाचार घडलेला आहे. तसा तो राजकिय कारणांमुळे देखील घडून आलेला आहे. राष्ट्रीय त्याचबरोबर राज्यपातळीवर सत्ता प्राप्त करणे यासाठी सांप्रदायवादाची निर्मिती केली जाते. राजकिय उद्दीष्ट्य पूर्ण करण्यासाठी पूर्व नियोजित हिंसाचार घडवून आणला जातो. धर्माच्या आधारे लोकांच्या भावना जागृत करून कोणतीही क्रिया करण्यासाठी पूर्व नियोजीत हिंवसाचार घडवुन मानसिकता निर्माण केली जाते.
* उदा :- मुस्लिम लोकांची 1956 मध्ये केलेली स्थापना भारत पाकिस्तानची फाळणी इ. राजकिय स्वार्थ



Scanned with CamScanner

साधव्यास जाणिव पूर्वक सांप्रदायिक वादाला खतपाणी घातले जाते.

⑥ स्थानिक कारणे :-
भारतीय समाजात सांप्रदायवादाची जी निर्मिती झालेली आहे. त्यासाठी काहि स्थानिक घटक/कारणे जबाबदार आहेत
उदा ; विशिष्ट सांप्रदायाच्या मिरवणुकित दिल्या जाणाऱ्या घोषणा, परस्परांच्या भावना दुखवणारी पोस्टर लावणे. विशिष्ट प्रार्थना स्थळांसमोर घोषणा देणे इ. अशा स्थानिक कारणांचा परिणाम भिन्न सांप्रदायामध्ये तणावाची परिस्थिती निर्माण होवून हिंसाचार घडुन येतो.
उदा ; 2018 मधील भीमा कोरेगाव, संघर्ष, 2010 मध्ये महाराष्ट्रात मिरज सांगली येथील संघर्ष इ.

⑦ आर्थिक कारणे :-
विशिष्ट धर्मातील सांप्रदायातील लोकांच्या एखाद्या विशिष्ट व्यापारावर उत्पन्नावर मक्तेदारी निर्माण झालेली असते. त्यामुळे त्याच्या विरोधी धर्मातील सांप्रदायातील लोकांच्या आर्थिक व्यवहाराला गती मिळत नाही. अशा प्रकारच्या आर्थिक सांप्रदायामध्ये संघर्ष वाढीस लागतो.
अलिगड, मालेगाव, भिवंडी या ठिकाणाची परिस्थिती ज्या सांप्रदायाच्या आर्थिक स्थर वाढलेली असतो. तो सांप्रदाय स्थानिक पातळीपासुन ते उच्च पातळी पर्यंत आपल्यावरती डाव करत असतात. अशा अर्थ विरोधी सांप्रदायातून लावला जातो. त्याचा परिणाम कोणत्यातरी कारणावरुन सांप्रदायिक हिंसाचार घडून येतो. सांप्रदायाच्या निर्मीतीसाठी आर्थिक घटक देखील जबाबदार ठरत असतो.

(8) समान नागरीक कायद्याच्या प्रश्न :-
धर्म निरपेक्ष राष्ट्र म्हणून संपूर्ण विश्वभर भारतात ओळखले जाते. भारतातील सर्व जाती, धर्म, पंथ, सांप्रदाय लोकांसाठी सर्वांना समान नागरिक कायदा असावा अशी मागणी केली जात आहे. भारतात या संदर्भात मतभेद दिसून येतात.
उदा : मुस्लीम लोकांसाठी काहि स्वतंत्र्य अधिकार आहेत. अशा प्रकारचे अधिकार इतर समुदायांना मात्र नाहीत राखीव जागांचा प्रश्न विशिष्ट धर्मांच्या तीर्थयात्रांसाठी सवलत इ. अशा घटनांचा परिणाम आणि समान नागरी कायद्याच्या आभावामुळे लोकांच्या मनातील असंतोष हिंसाचाराच्या माध्यमातून व्यक्त केला जातो.

(9) आंतराष्ट्रीय कारणे :-
भारतातील सांप्रदायिक वाद व इतर वाद किंवा संघर्ष घडून येण्यापाठीमागे बाह्य देशांच्या प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष प्रभाव वाढत चालला आहे. काही आपल्या गुप्त हेर संघटनांच्या साहाय्याने भारतात बॉमस्फोट घडवून आणणे मुलतत्ववादी विचारांना प्रोत्साहन देणे इ. मार्गांनी प्रयत्नशील आहेत भारतातील सांप्रदायिक, धर्मनिरपेक्षता नष्ट करुन सामाजिक असुरक्षीतता निर्माण करण्याचा प्रयत्न काही आंतरराष्ट्रीय घटकांच्या कडून केला जात आहे.

(10) प्रशासकिय दोष :-
सांप्रदायिक, सांप्रदायवाद हिंसाचार निर्मिती च्या कारणांच्या शोध घेताना असे दिसून येते कि कायदा व न्याय व्यवस्था पोलिस यंत्रणा गुप्तचर, विभाग शासन यांच्यातील समन्वयाच्या अभाव, अकार्यक्षमता, भ्रष्टाचार यंत्रणाक्रियेला वेळ यासारख्या

प्रशासकिय उणिवांमुळे सांप्रदायिकवाद वाढत जाण्यास मिळत आहे.

(11) प्रसारमाध्यमांचा गैरवापर :-

भारतीय समाजात प्रसारमाध्यमे, सोशल मिडीया इ. गैरवापर करुन सांप्रदायिकवाद व हिंसाचार घडवून आणला जात आहे. या माध्यमांमधून एखाद्या समुदाया बद्दल भावना दुखवणाऱ्या बातम्या प्रसिद्ध केल्याने हिंसाचारीयासाठी आवश्यक अशी परिस्थिती निर्माण होते. त्यामधुनच सांप्रदायिक हिंसाचार घडुन येतो.

(12) मुलतत्ववाद :-

मुलतत्ववाद ही एक विशिष्ट प्रकारची विचारसणी आहे. लोकशाही धर्मनिरपेक्षता याच्या विरोधी विचार-सरणी म्हणून मुलतत्ववादाला रोखले जाते. ही विरारसरणी कट्टर धर्मात स्पर्धा श्रेष्ठता महत्व देत असल्याची समाजामध्ये विघटन घडुन येत असते. आजभारतातील विविध सांप्रदायामध्ये मुलतत्ववादी विचारसरणी निर्माण झाल्याने सांप्रदायिक वादाला चालना मिळत आहे.

भारतामध्ये सांप्रदायिकता व सांप्रदायिक हिंसाचार घडून येण्यासाठी वरिल काही घटक, कारणे जबाबदार असल्याचे दिसून येते.

## * उपाययोजना :-

* प्रस्तावणा :-

सांप्रदायिक वाद व त्यामधुन निर्माण होणारा संघर्ष हिंसाचार हि एक सार्वत्रिक स्वरुपात भारतीय समाजाला भेडसावणारी समस्या म्हणून ओळखले जाते. सांप्रदायिक वाद हा भारतीय राष्ट्रीय एकात्मते



Scanned with CamScanner

समोरील सर्वात मोठा अडथळा आहे. परिणामी हा सांप्रदायिक वाद थांबवण्यासाठी त्यावरती उपाययोजना करणे आवश्यक आहेत. त्यासाठी काही उपाय तात्काळी तर काही दिर्घकालीन स्वरुपाचे असतील ते पुढील प्रमाणे.

Ⓐ तात्कालीन उपाययोजना :-

सांप्रदायवाद व त्या आधारे घडून येणारा संघर्ष हिंसाचार अशा घटना घडताच अत्यंत निपक्ष पणे व कौशल्य पुर्व त्याचा सामना करता आला पाहिजे. अशा घटना रोखण्यासाठी काही तातडीच्या तात्कालीन उपाययोजना पुढील प्रमाणे :-

① विशेष दंगलविरोधी दलाची निर्मिती :

एखादी दंगल झाल्यास त्या ठिकाणी शांतता प्रस्तापित करणे आवश्यक असते. धार्मिक सन, उत्सव, अशा प्रसंगी अशा प्रकारचे संघर्ष अधिक होतात. हे लक्षात घेवून दंगल विरोधी दलाची निर्मिती करण्यात यावी. त्यामुळे सांप्रदायीक वाद व त्यातून निर्माण झालेला संघर्ष थांबवणे सुलभ होईल.

② शांतता समितीची स्थापना :

सांप्रदायिकवाद थांबवण्यासाठी महत्वाचा तात्काळी उपाय म्हणजे शांतता समितीची जागो जागी स्थापना करणे. विशेषतः संवेदन शील भागात विविध सांप्रदायातील सामाजिक कार्यकर्त्यांची समिती स्थापन करावी त्या समीती कडून सर्व सांप्रदायामध्ये बंधूभाव, सदभावना, यांची वाढ कशी होईल यासाठी प्रयत्न केल्यास सांप्रदाय वादाचे प्रमाण कमी होईल.

③ कार्यक्षम पोलिस यंत्रणा :-

सांप्रदायवाद रोखण्यासाठी कार्यक्षमाची गुप्त हेर संघटना निर्माण केली जावी त्याबरोबरच हा वाद निर्माण करणाऱ्या व्यक्तिंना अटक करणे. न्यायालयासमोर हजर करणे ही कामे यशस्वी पणे केल्यास सांप्रदायिक वाद रोखता येईल जे पोलिस अधिकारी कर्मचारी आपली जबाबदारी पार पडण्यास कमी पडले. त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. प्रभावी काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची दखल घ्यावी अशा प्रकारे कार्यक्षम पोलिस यंत्रणा निर्माण केल्यास सांप्रदायिकवाद नष्ट करणे शक्य होईल

④ न्यायालयीन प्रक्रिया गतिमान करणे :-

सांप्रदायीकवाद व त्यामधुन घडून येणारा हिंसाचार यामध्ये जीवीत व वित्त प्रकारची हानी होत असते. त्यामुळे अशा घटनांना जबाबदार व्यक्तींचा शोध चौकशी, निपक्षपणे कायद्यांच्या आधारे करून त्याचा शोध घेतला पाहिजे. अशा घटनांना तातडीने अटक करणे करणे, आरोप पत्र दाखल करणे शिक्षा देणे ही सर्व न्यायालयीन प्रक्रीया गतिमान झाल्यास भविष्यात अशा घटनांचे प्रमाण कमी होईल सांप्रदायवाद रोखण्यासाठी न्यायालयिन प्रक्रिया गतिमान केली पाहीजे.

⑤ आर्थिक नुकसान भरपायी :-

सांप्रदायिक संघर्षामध्ये ज्यांचे नुकसान झाले आहे. ज्या कुटुंबातील जीवित हानी झाली आहे. अशा लोकांना शासनाकडून तातडीने भरपूर आर्थिक नुकसान भरपायी दिली पाहिजे. यामुळे अशा घटकांना आधार दिलासा मिळेल आणि द्वेशात्मक सुडीची भावना निर्माण होणार नाही त्यामुळे अशा घटनांमध्ये बाधीत लोकांना त्वरीत नुकसान भरपायी देऊन त्यांचे जीवन पूर्ववत सुरू करावे.

⑥ प्रसार माध्यमांवर नियंत्रण :-

सांप्रदायिक हिंसाचाराच्या काळात प्रसार माध्यमांची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण असते. प्रसारमाध्यमे अस्वस्त वातावरण एकतर भावना भडकवण्याचे काम करतात. किंवा निर्माण झालेला हिंसाचार रोखू शकतात. प्रसार माध्यमे चुकिच्या अफवांचे निरसन करुन शकतात मनातील भीती, द्वेष, दूर करु शकतात. प्रसारमाध्यमांवर सरकारचे नियंत्रण असायला हवे यामुळे दंगल रोखण्यासाठी किंवा पुन्हा दंगल होवू नये यासाठी प्रसार माध्यमांची भूमिका महत्वपूर्ण असायला हवी.

⑦ सांप्रदायिक संघटनांचे लक्ष समजून घेणे :-

समाजामध्ये कार्यरत असणाऱ्या जहाल, सांप्रदायिक संघटनांचे लक्ष उद्दीष्ठ तात्काळ समजून घेतली पाहिजे कायदा व सुव्यवस्था बाधीत करणाऱ्या व्यक्ती संघटना यांना सरकारणे तात्काळ रोखायला हवे.

पंजाबमधील खलीस्तानी दहशतवाद अशा संघटनांवर नियंत्रण ठेवल्यास शांतता प्रस्तापित होण्यास मदत होईल.

सांप्रदायवाद व सांप्रदायिक हिंसाचार संघर्ष, दंगल घडून आलेल्या ठिकाणी वरील तातडीच्या उपाय योजना स्वीकारल्या अशा ठिकाणी शांतता प्रस्थापीत होण्यास मदत होईल.

## B) दीर्घकालीन उपाय :-

भारतीय समाज व्यवस्थेवरुन सांप्रदायिक वाद नष्ट करण्यासाठी काही दिर्घकालीन उपाय केले पाहिजे ज्यामुळे भविष्यात सांप्रदायीक वाद हिंसाचार संघर्ष निर्माण होणार नाहीत. काही दूरगामी उपाय योजना



Scanned with CamScanner

पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

① धार्मिक समंजस :-

धर्म आणि धार्मिक आचरण ही प्रत्येकाची वैयक्तिक बाब असली तरी त्या आधारे सांप्रदायिक हिंसाचार निर्माण करणे किती विघातक आहे हे लोकांना पटवून दिले पाहिजे. परस्पर भिन्न-भिन्न धर्मांमध्ये सहकार्य सामंजस्य वाढवले पाहिजे. कुटुंब, शिक्षण संस्कार अशा माध्यमांमधुन सहिष्णुता समता, मानवता या विचारांचा प्रभाव व्यक्तिमहत्वावरती झाला पाहिजे. विशेषता हा भारतात हिंदू मुस्लीम या दोन धर्मांमध्ये सामंज्यस निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. सर्वच धर्मांमध्ये अशा प्रकारची भावना वाढल्यास सांप्रदायिक-वादाचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

② धर्मांचा तुलनात्मक अभ्यास :-

प्रत्येक धर्माचे तत्वज्ञान परंपरा, श्रद्धा, यामध्ये भिन्नता असली तरी शेवटी सर्व धर्मांची शिकवण कल्याणकारी स्वरूपाची असते. ही वस्तुस्थिती समाजापर्यंत पोहचवण्यासाठी धर्मांचा तुलनात्मक अभ्यास वस्तुनिष्ठपणे होणे आवश्यक आहे. यामुळे देखील सामंज्यस सहकार्य सहिष्णुता अशा भावना वाढीस लागतील त्याचा परिणाम सांप्रदायवादाची निर्मिती अधिक प्रमाणात होणार नाही.

③ मुलतत्ववादी विचारांना प्रतिबंध :-

भारतात गेल्या काही दशकांमध्ये मुलतत्ववादी विचारांचा प्रसार होवून लागल्याने अनेक वेळा जातीय. धार्मिक संघर्ष घडून आलेला आहे. व्यक्तिगत हीत, राजकिय स्वार्थ साधण्यासाठी अशा मुलतत्ववादी विचारांचा जाणीव पुर्वक प्रसारण केला जातो. त्यामुळे मुलतत्ववादी विचारांना वेळीच प्रतिषेध केला पाहिजे. धर्मापेक्षा



Scanned with CamScanner

मानवता महत्व पूर्ण आहे. हे सर्वांपर्यंत पोहचवले पाहिजे

④ असांप्रदायिकतेची प्रक्रिया निर्माण करणे :-
समाजात सर्वत्र असांप्रदायिकतेची प्रक्रिया सर्व स्तरांमध्ये सुरु केली पाहिजे. सांप्रदायिक वाद किती अनिष्ठ हानिकारक आहे. याची जाणीव निर्माण केली पाहिजे. सांप्रदायिकतेमुळे सामाजिक, आर्थिक, प्रश्न सोडवले जावू शकत नाहीत. हे सत्य लोकांना पटवून दिले गेले पाहिजे. सांप्रदायीक वाद रोखण्यासाठी असांप्रदायिकतेची प्रक्रिया निर्माण करणे आवश्यक आहे.

⑤ तरुणांना अर्थपूर्ण रित्या इतरत्र गुंतवले पाहिजे.

⑥ राजकिय लोकांचे सांप्रदायिकरण रोखले पाहिजे.

⑦ धर्मनिरपेक्ष मुल्याधिष्ठीत शिक्षणाचा प्रसार केला गेला पाहिजे.

⑧ सर्व निष्ठ अशा राष्ट्रीय इतिहासाच्याच प्रसार केला गेला पाहिजे.

⑨ वस्तूनिष्ठा अशा राष्ट्रीय इतिहासाच्याच प्रसार केला पाहिजे.
वरिल प्रमाणे दीर्घकालीन उपाय योजनांचा स्वीकार व अमल बजावणी केल्यास सांप्रदायिकवाद व त्यामुळे निर्माण होणारा संघर्ष, हिंसाचार अशा घटनांचे प्रमाण कमी होवून राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीस लागण्यास मदत होईल.



Scanned with CamScanner

## (B) स्त्रीभ्रुणहत्या : अर्थ, कारणे, आणि उपाययोजना

* **प्रस्तावणा :-**

स्त्रीभ्रूणहत्या हा भारतीय समाजातील स्त्रीयां वरील सामाजिक अत्याचाराचा एक प्रकार आहे. भारतात मुलींच्या जन्माकडे फारसे आपुलकिने पाहिले जात नाही. हे वास्तव आहे. यासाठी अनेक कारणे देखील जबाबदार आहेत, भारतीय स्त्रीयांवरील कौटुंबीक व सामाजिक अनेक अत्याचार होत असल्याचे आजही निदर्शनास येते. उदा; हुंडा बळी, पत्नीस मारहाण करणे, बलात्कार इ. भारतीय समाज हा पुरुष प्रधान समाज म्हणून ओळखला ~~आहे~~. जात असल्याने सतत स्त्रीयांवरती अत्याचार झाल्याचे दिसून येते. आजच्या आधुनिक समाजातील स्त्रीयांवरील अत्याचाराचे एक गंभीर प्रकार म्हणून स्त्रीभ्रुण हत्या यास ओळखले जाते.

* **अर्थ :-**

आज भारतीय समाजात आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापर करुन मुलींचा जन्म होणे टाळले जात आहे. त्याचा परिणाम स्त्रीपुरुष लिंग गुणोत्तरावर होवून मुलींची संख्या कमी होत चालली आहे. 2001 साल च्या गणणेनुसार भारतीय लोकसंख्येत दरहजारी स्त्रीयांचे प्रमाण 933 होते. तर 2011 च्या गणणेनुसार हे प्रमाण 914 पर्यंत खाली आहे. महाराष्ट्रातील आकडे-वारी तर यापेक्षा अधिक भयानक आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे. लिंग परिक्षण व त्यानंतर स्त्रीलिंग असल्यास गर्भपात केला जाणे होय. स्त्रीभ्रुणहत्या हा अत्याचाराचा अमानवी प्रकार असून तो सामाजिक समस्येच्या स्वरुपात भेडसावत आहे.

"स्त्रीभ्रुण हत्या म्हणजे मुलगी जन्माला येण्या-आधीच गर्भपात करुण होणे होय."

" भ्रुणहत्या म्हणजे स्त्रीच्या गर्भामध्ये अर्भक आहे हे सिद्ध झाल्यानंतर ते जन्मापूर्वीच काढून टाकणे होय. आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे हे अर्भक कोणत्या लिंगाचे आहे हे समजते. ते जर स्त्री लिंगाचे असेल आणि ते नको असल्यास केला जाणारा गर्भपात म्हणजे स्त्रीभ्रुण हत्या होय."

आधुनिक युगात गर्भ ओळखण्यासाठी गर्भजल - गर्भलिंग चाचणी केली जाते. या चाचणीच्या आधारे मुलीचा गर्भ असल्यास तो हेतूपूर्वक नष्ट केला जातो. आणि हा गर्भ जर मुलाचा असेल तर तो वाढवला जातो. याचाच अर्थ गर्भलिंग निवड चाचणी करुन स्त्री जन्मावर आघात करणे हा सर्वात मोठा अत्याचार आहे. गर्भलिंग निदान करणे व गर्भपात करणे हा कायद्याने गुन्हा असला तरी अनेक लोक स्त्रीभ्रुण हत्या घडून आणतात.

## * स्त्रीभ्रुणहत्या आणि सामाजिक विषमता :-

मुलगाच पाहिजे किंवा पुत्रप्राप्तीला प्राधान्य या लालसेपोटी स्त्रीभ्रुणहत्या ही समस्या निर्माण झालेली आहे. बेकायदेशीर पणे गर्भलिंग निदान करुन मुलींचा गर्भ नष्ट केला जातो. भारतात स्त्रीपुरुष प्रमाणात असमतोल निर्माण झाला आहे. या असमतोलामुळे अनेक समस्यांची निर्मीती झालेली आहे.

## भारतातील लिंग गुणोत्तरांचे घटते प्रमाण :-

| जनगणना वर्ष | दरहजारी लिंग गुणोत्तर | (सन 2011 मधील महाराष्ट्रातील हेच लिंग गुणोत्तराचे प्रमाण 883 इतके कमी झाले आहे. ही सर्व लिंग असमानता येणाऱ्या असंख्य घटक कारणे जबाबदार आहेत ती पुढील प्रमाणे :- |
|---|---|---|
| 1901 | 972 | |
| 1911 | 964 | |
| 1921 | 955 | |
| 1931 | 950 | |
| 1941 | 946 | |
| 1951 | 946 | |
| 1961 | 941 | |
| 1971 | 930 | |
| 1981 | 934 | |
| 1991 | 929 | |
| 2001 | 933 | |
| 2011 | 914 | |

## * स्त्रीभ्रुणहत्येची कारणे :-

स्त्रीभ्रुणहत्या हा स्त्रियांवरील अत्याचाराचा प्रकार व एक सामाजिक समस्या म्हणुन घडुन येणाऱ्यासाठी काही घटक, कारणे जबाबदार आहेत ती पुढील प्रमाणे :-

### ① मुलगा पाहिजे ही मानसिकता :-

भारतीय समाजात अगदी प्राचिण काळा पासुन ते आजही सर्वत्र आपल्या कुटुंबात मुलगाच पाहिजे ही मानसिकता, प्रवृत्ती मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. मुलगा म्हणजे वारसदार, वंशाचा दिवा, वृध्द वयातील आधार, सामाजिक प्रतिष्ठा अशा विविध कल्पना या मानसीकतेच्या पाठीमागे आहेत परिणामी मुलींचा जन्म नाकारला जातो. असल्याने स्त्रीभ्रुणहत्याने घडुन येण्याचे प्रमाण अधिक आहे.

② मुलींना दिला जाणारा दुय्यम दर्जा :-

भारतीय समाजात स्त्रीयांना दुय्यम स्थान दिले जात आहे. त्यामुळे स्त्रीचा जन्म होण्यापूर्वीच जीवन जगण्याचा अधिकार नाकारला जात आहे. मुलगा आणि मुलगी असा लिंगभेद केला जात असल्याने सामाजिक विषमता निर्माण झाली आहे. समाजात सर्वच क्षेत्रात मुलगा-मुलगी असा भेदभाव करुन दुर्लक्षित केला जात आहे परिणामी स्त्रीयांना दुय्यम दर्जा स्थान यामुळे होणारा लिंग भेदभाव स्त्रीभ्रूण हत्येनंतर कारणीभूत आहे.

③ मुलगी म्हणजे आर्थिक भार :-

कुटुंबात मुलगी जन्माला येणे हा भारतीय समाजात आई-वडिलांना आर्थिक भार वाढ लागला आहे. तीचे पालन, पोषण, शिक्षक, विवाह, हुंडा यावरती खर्च करावा लागतो. आणि शेवटी मुलगीला परक्याचे धन म्हणुन ओळखले जाते. त्यामुळे तीच्यावर होणारा खर्च अनाठायी वाढु लागला आहे. ही मानसीकता स्त्रीभ्रुन हत्येसाठी जबाबदार ठरत आहे.

④ हुंडा पद्धत :-

भारतीय समाजाला हुंडा या प्रथेची तीव्रता वाढत चालली आहे. हि तीव्रता रोखण्यासाठी 1961 मध्येच हुंडा प्रतिबंध कायदा करण्यात आला असला तरी आजही अनेक स्त्रीयांच्या हुंड्यासाठी छळ केला जात आहे. स्त्रीयांबरोबरच तीच्या कुटुंबाला देखील आर्थिक सामाजीक व मानसिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अशा स्थितीत आपल्या कुटुंबात मुलगी नको या भावनेपोटी स्त्रीभ्रुणहत्या घडुन येत आहे.



Scanned with CamScanner

⑤ सोनोग्राफी यंत्राची सहज उपलब्धता :-

सोनोग्राफी यंत्र सहज उपलब्ध होतात. सोनोग्राफी यंत्राचा वापर गर्भाचे संभाव्य धोके ओळखण्यासाठी वापर होणे अपेक्षीत आहे. परंतु या ऐवजी गर्भलिंग निदान करुन मुलीचा गर्भ असल्यास तो नष्ट करण्यासाठी या यंत्राचा गैरवापर आर्थिक प्रमाणात केला जात आहे. शहरांबरोबरच ग्रामिण भागातही सोनोग्राफी यंत्र सहज उपलब्ध होत असल्याने गर्भाचे लिंग निदान करण्यासाठी त्याचा अधिक वापर केला जात ~~आहे~~ आहे. परिणामी स्त्रीभ्रुण हत्या घडुन येत आहे.

⑥ महिलांमधील सामाजिक आर्थिक व शारिरीक असुरक्षीता

महिला सर्वांगीन दृष्ट्या सुरक्षित असणे. अत्यंत आवश्यक आहे. महिलांच्या सर्वांगिण सुरक्षिततेसाठी असंख्य कायदे, करण्यात आले असले तरी त्यांच्या अंमलबजावणीमध्ये अनेक अडथळे असल्याने आजही भारतीय स्त्रीया सामाजिक आर्थिक व शारिरीक दृष्टया असुरक्षित असल्याचे दिसुन येते.

अगदी प्राचिन काळापासुन स्त्रीया आपल्या गरजा पुर्ण करण्यासाठी इतरांच्यावर अवलंबुन रहावे लागत असल्याने परावलंबीत व प्राप्त झाले आहेत.

समाजात पुरुषांच्या तुलनेत आजही स्त्रीयांना दुय्यम स्थान दिले जाते. सामाजीक जीवनात वावरताना विनयभंग, छेडछाड, बलात्कार अशा प्रकारचे अत्याचार घडुन येत आहे. शारिरीक दृष्टया स्त्री ही पुरुषांच्या तुलनेत अकार्यक्षम असल्याने अत्याचाराला सहज बळी पडतात. एकुणच भारतीय स्त्रीया सामाजिक आर्थिक व शारिरीक दृष्टया असुरक्षीतता असल्याने मुलींचा जन्म नाकारला जात आहे. अनेक समस्यांचा सामना करण्यापेक्षा स्त्रीभ्रुणहत्यांचे प्रमाण वाढत चालले आहे.



Scanned with CamScanner

(7) स्त्रियांबद्दल असणारे गैरसमज, अनिष्ठ प्रथा :-
भारतीय समाजात स्त्रियांच्या बाबतीत अनेक अनिष्ठ प्रथा, गैरसमज नेहमीच दिसून येतात उदा; स्त्री म्हणजे उपभोगाची वस्तू, स्त्रीचे जीवन म्हणजे काचेचे भांडे इ. अशा चुकीच्या समजूतींमुळे स्त्रीयांच्या व्यक्तीस्वातंत्र्यावर अनेक बंधने लावल्यात आली आहे. ~~विशेषत~~ विशेषत: आपल्या मुलीला जन्म देण्यापासुन वंचीत ठेवत असताना त्या आईचे मतदेखील विचारात घेतले जात नाही. अशा घटनांमुळे मुलींच्या विषयी नकारात्मक भावना होत चालल्याने स्त्रीभ्रूण हत्या होत आहेत.

(8) दारिद्र्य / निरक्षरता :-
आजही भारतात निरक्षरता, दारिद्र्य, बेरोजगारी या समस्या लोकांना भेडसावत आहेत. अशा गरीब स्त्रीयांमध्ये मुलीचे शिक्षण, पालन पोषण यावरती खर्च करणे लोकांना अवघड वाटत आहे. मुलींवरती खर्च करण्यापेक्षा तो खर्च मुलावरती केल्यास त्याचा कुटुंबाला फायदा होईल अशा प्रकारची मानसिकता वाढत चालली आहे. परिणामी मुलींच्या जन्माचा अधिकार नाकारला जात आहे.

(9) कायद्याच्या अंमलबजावणीचा अभाव :-
स्त्री-भ्रूण हत्या रोखण्यासाठी PCPNDT हा कायदा करण्यात आला आहे. गर्भपात कायदा देखील केला गेला आहे. या सर्व कायद्याच्या अंमलबजावणी मध्ये एकवाक्यता सुसंगता नसल्याने स्त्रीभ्रुणहत्या वाढत चालल्या आहेत. कायद्याने प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसल्याने अपप्रवृत्ती वाढत चालल्या आहेत.

(10) कमिशन एजंट व रॅकेट :-

स्त्रीभ्रुणहत्या म्हणजेच मुलगी असल्यास गर्भपात करणे. एक मोठे रॅकेट समाजात छुपिया पद्धतीने कार्यरत असते अधिक पैसे घेवून गर्भपात केला जातो. अनेक ~~डाक्टर्स~~ डाक्टर, नर्सेस, सोनोग्राफी सेंटरचे चालक हे यामध्ये सहभागी असतात. गर्भपात करण्यासाठी केसेस आणून देणाऱ्यास कमिशन दिले जाते. पैशाच्या लालसेपोटी स्त्रीभ्रूणहत्या घडून आल्याने होणाऱ्या परिणामांची तमा न बाळगता अनेक मुलींच्या जन्म घेण्याचा अधिकारच दाबवला जात आहे.

(11) रुढी, प्रथा, परंपरा प्रभाव :-

(12) सोनोग्राफीचा वाढता प्रभाव / प्रसार

स्त्रीभ्रुण हत्या घडून येण्यासाठी वरील सर्व कारणे कमी अधिक प्रमाणात जबाबदार आहेत.

* उपाययोजना :-

स्त्रीभ्रुणहत्या हा स्त्रीयांवरील अत्याचाराचा प्रकार नष्ट करण्यासाठी कायदेशीर उपाययोजनांबरोबरच प्रबोधनात्मक उपाय देखील अत्यंत आवश्यक आहे. ते पुढील प्रमाणे :-

(1) कायदेशीर उपाययोजना :-

प्रस्तूती पूर्व लिंग निदान तंत्राच्या गैरवापर करुन घडणाऱ्या स्त्रीभ्रुण हत्या रोखण्यासाठी केंद्र शासनाने 20 सप्टेंबर 1994 मध्ये प्रस्तूतीपूर्व निदान तंत्र हा कायदा मंजूर केला होता. या कायद्यामध्ये सुधारणा करुन 2003 मध्ये (गर्भधारणा पूर्व व प्रस्तुती पूर्व निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) हा कायदा करण्यात आला आहे.

अशा प्रकारचा कायदा करणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिलेच राज्य आहे.

लिंग निवडीस प्रतिबंध या कायद्यानुसार सोनोग्राफी मशिन, त्याचे ठिकाण दस्त ऐवज इ. नोंद करणे अनिवार्य करण्यात आलेले आहे. गर्भलिंग निदान करण्याचा उद्देश सिद्ध या कायद्यातील महत्वाची सूचना म्हणजे तरतुद गर्भलिंग निवडीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा दुरउपयोग करण्यास बंदी घालण्यात आली आहे. अनुवंशीक दोषांसाठी या तंत्राचा वापर करण्यावर काही मर्यादा घालण्यात आलेल्या आहेत गर्भलिंग निदान व निवड या तंत्राच्या जाहिरातीवर बंदी घालण्यात आलेली आहे. या कायद्याचे उल्लंघन केल्यास वैदयकीय व्यवसायिकास ३ वर्षापर्यंतचा कारावास व १० हजार दंड आणि पुढील प्रत्येक अफराधास ५ वर्षापर्यंत कारावास आणि १ लाख रुपये पर्यंतचा दंड होवू शकतो. अशा गुन्हा मधील व्यक्तीला न्यायालयातून जामिन दिला जात नाही. या संबधीचा खटला आपआपसात मिटवता देखील येत नाही. भारतातील स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी हा कायदा महत्व पूर्ण ठरला आहे.

② प्रबोधनात्मक उपाययोजना :-

स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी कायदेशीर उपाययोजना बरोबरच जनजागृती, लोकसहभाग, प्रबोधन हे देखील आवश्यक आहे. त्या दृष्टीने ही समस्या सोडवण्यासाठी काही प्रबोधनात्मक उपाययोजना पुढील प्रमाणे.

① स्त्री जन्माचे स्वागत :-

स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी समाजातील सर्व घटकांकडुन स्त्री जन्माचे स्वागत मुलांच्या



Scanned with CamScanner

जन्माप्रमाणेच केले पाहिजे. मुलींच्या जन्माचे महत्त्व देखील पटवून दिले पाहिजे. स्त्री जन्माचे स्वागत केल्यास निषेध स्त्रीभ्रूणहत्याचे प्रमाण कमी होत जाईल.

② स्त्रीयांना सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करून देणे :-

समाजामध्ये आजही अनेक ठिकाणी स्त्रीयांना दुय्यम दर्जा दिला जातो. ही मानसिकता नष्ट करून स्त्रीयांना सर्व ठिकाणी समान अधिकार, मानसन्मान प्रतिष्ठा देणे आवश्यक आहे. शिक्षण, नोकरी, व्यवसाय, राजकारण, अशा प्रत्येक ठिकाणी त्यांच्या कर्तृत्वाला योग्य संधी दिली पाहिजे. स्त्रीयांना समाजामध्ये ज्यावेळी प्रतिष्ठा प्राप्त होईल त्यावेळी त्यांच्यावरील अत्याचारांचे, अन्यायाचे प्रमाण कमी होईल. त्यावेळी त्यांच्या वरील अन्याय कमी होतील. परिणामी स्त्रीभ्रूण हत्या देखील बंद होईल.

③ स्त्री संरक्षणात वाढ करणे :-

इतर देशांच्या तुलनेत भारतीय स्त्रीया आज हि असुरक्षीत असल्याने त्यांच्या वरील अत्याचारांचे प्रमाण आधिक आहे. हे अत्याचार रोखण्यासाठी कायदे-शीर हक्कांची अंमलबजावणी प्रभावी पणे केली पाहिजे स्त्रीयांना देखील निर्भय पणे समाजात वावरता आले पाहिजे सुखी जीवनाचा उपयोग घेता आला पाहिजे हे सर्व शक्य होण्यासाठी स्त्रीयांना संरक्षण दिले गेले पाहिजे.

④ हुंडा बंदी कायद्याची अंमलबजावणी :-

भारतात हुंडा हि प्रथा अप्रत्यक्षपणे स्त्रीभ्रूण हत्येसाठी जबाबदार आहे. हुंडा देणे, हुंड्यासाठी छळ करणे. आर्थिक अशा कारणांमुळे मुलींच्या जन्माचे स्वागत केले जात नाही. त्यामुळे स्त्रीभ्रूण हत्या रोखण्या--साठी हुंडाबळी कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी



Scanned with CamScanner

होणे आवश्यक आहे.

⑤ लोकसहभाग / अभियान :-

स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी समाजामध्ये जनजागृती करणे लोकांचा सहभाग यामध्ये वाढवणे प्रबोधन करणे. अत्यंत आवश्यक आहे यासाठी विविध अभियान सुरु करणे आवश्यक आहे.

उदा ; कोल्हापूरचे माजी जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांनी 'लेक वाचवा' हे अभियान लोक सहभागातील यशस्वी राबवलेले आहे. त्या बरोबरच महाराष्ट्र शासनाने 2011 च्या जनगणनेतील स्त्रीयांचे घटते प्रमाण विचारात घेवून 'सावित्रीच्या लेकी' व 'बेटीबचाओ' हे अभियान सुरु केले आहे. अशा प्रकारे उपक्रम राबवण्यात आलेले आहेत.

⑥ गर्भधारणा पूर्वक आणि प्रसुती पुर्व गर्भलिंग निदान प्रतिबंध कायदा 2003 या कायदयाची प्रभावीपणे अंमल बजावणी करणे.

⑦ स्त्री- पुरुष समानता प्रस्थापित करणे.

वरिल प्रमाणे कायदेशीर व प्रबोधनात्मक उपाययोजनांचा स्वीकार केल्यास स्त्रीभ्रूणहत्येचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

* प्रश्न :-

① सांप्रदायवाद म्हणजे काय हे सांगुन सांप्रदायवादाची कारणे स्पष्ट करा.

② सांप्रदायवाद निर्मुलनासाठी उपाययोजना स्पष्ट करा.

③ स्त्रीभ्रुण हत्येचा अर्थ स्पष्ट करुन त्यासाठी जबाबदार असणारी कारणे स्पष्ट करा ?

④ स्त्रीभ्रुण हत्या प्रतिबंधा विषयी उपाययोजना स्पष्ट करा.

* टिपा लिहा.

① सांप्रदायवादाचा अर्थ

② सांप्रदायवादाची कारणे.

③ सांप्रदायवाद नष्ट करण्यासाठीच्या उपाययोजना

स्त्रीभ्रुण हत्येचा अर्थ

स्त्रीभ्रुण हत्येची कारणे

स्त्रीभ्रुण हत्या - प्रबोधनात्मक उपाय योजना.



Scanned with CamScanner